आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
३१ मे २०२५ - शनिवार

**ठळक बातम्या**

- पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या विचारांचं अनुकरण करण्याची गरज असल्याचं प्रधानमंत्र्यांचं प्रतिपादन

- दहशतवादा विरोधात भारताच्या भूमिकेला कोलंबियाचा पाठिंबा, पाकिस्तानाच्या समर्थनार्थ केलेलं विधान मागे घेतलं

- मिझोराममध्ये भूस्खलन होऊन झालेल्या दुर्घटनेत ५ जणांचा मृत्यू, लाँगटलाई शहरात इमारतीच्या ढिगाऱ्याखाली अनेकजण अडकल्याची भीती, बचावकार्य सुरू

**आणि**

- रशिया आणि युक्रेन यांच्यातील संघर्षाची मूळ कारणं दूर होईपर्यंत लष्करी मोहीम सुरू ठेवण्याची रशियाची भूमिका

**<><><><><>**

पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांचे विचार प्रेरणादायी असून त्यांच्या विचारांचं अनुकरण करण्याची आज गरज आहे असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. ते आज भोपाळ इथं आयोजित ‘देवी अहिल्याबाई होळकर महिला सशक्तीकरण महासंमेलनात’ बोलत होते. अहिल्यादेवींचं नाव ऐकताच मनात श्रद्धाभाव निर्माण होतो आणि कोणत्याही कठीण परिस्थितीत राज्य, कसं पुढे न्यायचं हे त्यांच्याकडून शिकण्यासारखं आहे, असं ते यावेळी म्हणाले. अहिल्यादेवींनी एक उत्तम प्रशासक आणि लोकशाहीचं उत्तम प्रमाण सादर केलं. जलसंवर्धनाचं महत्व अधोरेखित करत त्यांनी अनेक धार्मिक स्थळांचा उद्धार केला आणि तीनशे वर्षांपूर्वीच्या गुलामगिरीच्या काळात सशक्त राज्य उभारत स्त्री शक्तीचा समाजासमोर आदर्श ठेवला, असं प्रधानमंत्री म्हणाले.

**होल्ड बाईट - प्रधानमंत्री**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज अहिल्याबाई होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंतीनिमित्त मध्य प्रदेशच्या दौऱ्यावर आहेत. अहिल्याबाईंच्या स्मरणार्थ आज एका टपाल तिकिटाचं आणि विशेष नाण्याचंही मोदी यांच्या हस्ते प्रकाशन झालं. तसंच अनेक प्रकल्पांचं आणि योजनांचं लोकार्पण यावेळी करण्यात आलं. तर इंदूरच्या मेट्रो स्थानकाचं त्यांनी यावेळी दूरस्थ प्रणालीद्वारे उद्घाटन केलं. या कार्यक्रमाला मध्यप्रदेशचे राज्यपाल, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि इतर मान्यवर उपस्थित होते.

**<><><><><>**

पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या राजवटीत कृषी, कर आणि न्याय पद्धती आदर्श होती. त्यांनी केलेलं कार्य तीनशे वर्षांनीही प्रेरणादायी आहे, असं प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं. अहिल्यानगर जिल्ह्यातल्या चौंडी इथं अहिल्याबाई होळकर यांच्या त्रिजन्मशताब्दी वर्षानिमित्त आयोजित जयंती उत्सवात ते बोलत होते. यावेळी विविध विकासकामांचा प्रारंभ मुख्यमंत्र्यांच्या हस्ते झाला.

अहिल्याबाईंनी दलित, वंचितांच्या उत्थानासाठी अनेक योजना आणल्या, एवढं मोठं ऐश्वर्य असूनही त्यांनी साधी राहणी स्वीकारली म्हणूनच त्यांना पुण्यश्लोक म्हणतात, असं फडणवीस म्हणाले.

त्याआधी अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंती निमित्तानं चौंडी ते इंदूर या बस सेवेचा प्रारंभ करण्यात आला.

**<><><><><>**

**अहिल्याबाई होळकर** यांच्या जयंतीनिमित्त आज राज्यभरात विविध कार्यक्रम झाले. गोंदिया जिल्ह्यातल्या आमगाव देवरी विधानसभा क्षेत्राचे आमदार संजय पुराण यांच्या पुढाकारानं आयोजित एका कार्यक्रमात १०वी आणि १२ वी मध्ये अव्वल क्रमांक पटकावणाऱ्या विद्यार्थ्यांचा आज सत्कार करण्यात आला.

त्याचप्रमाणे सामाजिक कार्यात महत्वाचं काम केलेल्या महिलांचा देखील यावेळी शाल आणि स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. **धुळे** जिल्ह्यात धनगर समाज युवा संघटनांनी मोटरसायकल रॅली काढली. **सांगली** जिल्ह्यात अहिल्याबाई होळकर यांच्या जयंतीनिमित्त विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं. तसंच विविध स्पर्धांचं आयोजनही करण्यात आलं. मिरज इथं जयंतीचं औचित्य साधून रांगोळीकार आदमअली मुजावर यांनी अहिल्याबाईंची ८० बाय ६० फुटांची रांगोळी काढली. **नांदेडमधेही** अहिल्याबाई होळकर यांची जयंती विविध कार्यक्रमांनी साजरी झाली.

**<><><><><>**

दहशतवादाविरोधात भारताची भूमिका स्पष्ट करण्यासाठी सात बहुपक्षिय शिष्टमंडळ वेगवेगळ्या देशांना भेटी देत आहेत.

काँग्रेस खासदार शशि थरूर यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने आज कोलंबियाच्या परराष्ट्र व्यवहार उपमंत्री रोझा योलांडा व्हिलाविचेन्सिओ यांची भेट घेतली. या भेटी दरम्यान पाकिस्तानबद्दल शोक व्यक्त करणाऱ्या कोलंबियाच्या विधानावर थरूर यांनी नाराजी व्यक्त केली. मात्र भारताच्या भूमिकेला कोलंबियानं पाठिंबा दिला असून हे विधान मागे घेतल्याचं त्यांनी समाजमाध्यमावर केलेल्या पोस्ट मध्ये म्हटलं आहे.

शिवसेना खासदार श्रीकांत शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने सिएरा लिओनचा दौरा पूर्ण केला. शिष्टमंडळाने संसदेचे सभापती, उपसंरक्षण मंत्री, राष्ट्रीय सुरक्षा समन्वयक, यांच्यासह सिएरा लिओनच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी चर्चा केली.

द्रमुक खासदार कनिमोळी यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने लाटवियामधल्या भारतीय समुदायाशी संवाद साधला.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने आज इथिओपियामध्ये आफ्रिकन युनियनशी चर्चा

केली. जगभरातील दहशतवाद रोखण्यासाठी भारत आणि आफ्रिकन युनियन यांच्यात सहकार्याचा मार्ग मोकळा झाला आहे. शिष्टमंडळाने काल समृद्धी पक्षाचे उपाध्यक्ष आणि इथिओपियाचे उपप्रधानमंत्री अदेम फराह यांची भेट घेतली तसंच दहशतवादाविरुद्ध भारताची असहिष्णुतेची भूमिका स्पष्ट केली.

**<><><><><>**

मिझोराममध्ये गेल्या ३ दिवसांपासून सुरु असलेल्या मुसळधार पावसामुळे अनेक ठिकाणी भूस्खलन होऊन झालेल्या दुर्घटनेत किमान ५ जणांना प्राण गमवावे लागले आहेत. चंफाई जिल्ह्यात म्यानमार सीमारेषेजवळ झालेल्या भूस्खलनात एकाच कुटुंबातल्या २ महिलांसह तिघांचा मृत्यू झाल्याची माहिती ग्रामपरिषदेच्या अध्यक्षांनी आकाशवाणी प्रतिनिधीला दिली.

सेरछिप जिल्ह्यात भूस्खलनामुळे एकाचा मृत्यू झाला तर अनेक इमारतींची पडझड झाली. सेरछिप-ऐझवाल दरम्यान राष्ट्रीय महामार्गावर मोठी दरड कोसळल्यानं हा महामार्ग बंद करण्यात आला आहे.

लाँगटलाई शहरातही भूस्खलनामुळे एका उपहारगृहासह सहा इमारती कोसळल्या असून ढिगाऱ्याखाली अनेक रहिवासी अडकल्याची भिती व्यक्त केली जात आहे. या सर्व ठिकाणी एसडीआरएफची पथकं तसंच स्थानिक प्रशासनानं बचावकार्य सुरू केलं आहे. मात्र, मुसळधार पावसामुळे बचावकार्यात अडथळे येत आहेत.

**<><><><><>**

रशिया आणि युक्रेन या दोन्ही देशातल्या संघर्षाची मूळ कारणं दूर होईपर्यंत आणि शांतता करारांना औपचारिक मान्यता मिळेपर्यंत युक्रेनमध्ये आपली लष्करी मोहीम सुरु ठेवणार असल्याचं रशियानं म्हटलं आहे. परस्पर देशांमध्ये औपचारिक आणि कायमस्वरपी करार होईपर्यंत कोणत्याही बिनशर्त युद्धबंदीला रशियाचा नकार असेल, असं रशियन स्टेट ड्युमाच्या संरक्षण समितीचे अध्यक्ष एंड्री कार्तापोलोव

यांनी स्पष्ट केलं. रशिया पुन्हा कोणत्याही भ्रमांना बळी पडणार नसून आक्रमण सुरूच ठेवेल, असं त्यांनी सांगितलं. पाश्चिमात्य देशांनी रशियाला दिलेल्या पोकळ आश्वासनांबद्दल त्यांनी तीव्र शब्दात नाराजी व्यक्त केली.

दरम्यान, संयुक्त राष्ट्रांमध्ये रशियाचे राजदूत व्हॅसिली नेबेन्झिया यांनीही त्यांच्या भूमिकेचं समर्थन केलं आहे. युक्रेन जर कायमस्वरूपी तोडग्यासाठी ठोस पावलं उचलणार असेल तरच रशिया तत्वतः युद्धबंदीचा विचार करायला तयार आहे, असं ते म्हणाले. युक्रेनचे अध्यक्ष वोलोदिमीर ज़ेलेंस्की यांना लोकशाही, जबाबदारी आणि भ्रष्टाचाराच्या आरोपांचा सामना करावा लागू नये म्हणून युक्रेन जाणूनबुजून संघर्ष लांबवत असल्याचा आरोप नेबेन्झिया यांनी केला. तसंच युरोपातले काही घटक अमेरिकेची दिशाभूल करून शांतता चर्चा स्थगित करण्याचा प्रयत्न करत असल्याबद्दल त्यांनी रोष व्यक्त केला.

**<><><><><>**

सी बी आय अर्थात केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभागानं राष्ट्रीय जनता दलाचे अध्यक्ष आणि माजी रेल्वे मंत्री लालूप्रसाद यादव यांच्याविरोधात जमिनीच्या बदल्यात नोकरी घोटाळ्यात दाखल केलेल्या खटल्याला स्थगिती देण्याची मागणी करणारी याचिका दिल्ली उच्च न्यायालयाने फेटाळली आहे. २००४ ते २००९ या कालावधीत रेल्वे मंत्री पदावर असताना यादव यांनी रेल्वेत नोकरी देण्याचे आमिष दाखवत त्या बदल्यात काही जणांकडून जमिनीचे तुकडे आपल्या कुटुंबियांच्या तसंच नातेवाईकांच्या नावावर हस्तांतरित केल्याचा त्यांच्यावर आरोप आहे. याप्रकरणी त्यांच्याविरीधात खटला दाखल करण्यात आला होता.

**<><><><><>**

जम्मू आणि काश्मिरमध्ये भारतीय रेल्वेनं फलोत्पादन विभागाच्या सहकार्यानं कटरा रेल्वे स्थानक ते मुंबई पहिली समर्पित चेरी मालवाहतूक सेवा आजपासून सुरू केली. यामुळे, जम्मू काश्मिरच्या फलोत्पादन क्षेत्राला आणि त्याच्या मुख्य

बाजारपेठांशी संपर्क यंत्रणेला प्रोत्साहन मिळणार आहे. नाशवंत मालाला मुख्य बाजारपेठेत पोहोचवण्यासाठी विश्वसनीय आणि कार्यक्षम वाहतूक व्यवस्थाही यामुळे उपलब्ध होणार आहे.

**//<><><><><>//**